CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार दि. १७ नोव्हेंबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ५१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

### भारताने स्वीकारले G-20 चे अध्यक्षपद

**इंडोनेशिया** : इंडोनेशियातील बाली येथे सुरु असलेल्या जी-२० शिखर परिषदेत आज भारताने अधिकृतपणे जी-२० चे अध्यक्षपद स्वीकारले आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी इंडोनेशिया यजमान देशाने पुढील वर्षभरासाठी अध्यक्षपदाची जबाबदारी भारताकडे सोपवली आहे. इंडोनेशियाचे राष्ट्रपती जोकोवी विडोडो यांनी जी-२० चे अध्यक्षपद पंतप्रधान मोदी स्वाधीन केले आहे. यावेळी त्यांनी जोकोवी यांचे अभिनंदन करत मोदी म्हणाले की, जी-२० चे अध्यक्षपद स्वीकारणे ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आम्ही आमच्या देशातील विविध शहरे आणि राज्यांमध्ये जी -२० परिषदेच्या बैठका आयोजित करू इच्छितो. आमच्या पाहुण्यांना भारतातील आश्चर्यकारक विविधता, सर्वसमावेशक परंपरा आणि सांस्कृतिक समृद्धीचा पूर्ण अनुभव मिळेल.

### संजय राऊत यांना पुन्हा ईडीची नोटीस

**मुंबई** : जामीनावर बाहेर आलेल्या शिवसेना खासदार संजय राऊत यांना ईडीकडून नोटीस आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. चौकशीसाठी हजर राहण्याचं या नोटीसमध्ये म्हटलं आहे. विशेष पीएमएलए कोर्टातून संजय राऊत यांना जामीन देत असताना चौकशीसाठी व तपासासाठी सहकार्य करावे अशी अट ठेवण्यात आली होती. तब्बल १०० दिवसानंतर शिवसेनेचे फायरब्रँड नेते संजय राऊत यांना बुधुवारी (९ नोव्हेंबर २०२२) कोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला होता. आता ईडीनं चौकशीसाठी संजय राऊत यांना पुन्हा नोटीस पाठवली आहे. १८ नोव्हेंबर रोजी चौकशीसाठी हजर राहण्याची नोटीस ईडीकडून राऊतांना पाठवण्यात आली आहे. त्याशिवाय संजय राऊत यांचा जामीन रद्द करावा, अशी याचिका ईडीनं कोर्टात केली आहे.

# स्वगृही ग्रह फिरले, गृहनिर्माणासाठी कोल्हे शिंदेगृहात गेले

## पाहिला निवडणुकीचा स्वार्थ, साधला स्वप्नपूर्तीचा परमार्थ


सुराज्य/सोलापूर

**लक्ष्मी-विष्णू चाळीतील कामगारांना त्यांचे हक्काचे घरकुल मिळवून देऊन त्यांची स्वप्नपूर्ती करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकार आणि राष्ट्रवादीच्या नेते मंडळींनी कोलदांडा दाखवल्यामुळे कोल्हेंचे स्वगृहातील ग्रह फिरले. त्यातून वैतागलेल्या कोल्हे यांनी एकीकडे आगामी पालिका निवडणुकीचा स्वार्थ आणि दुसरीकडे गृहनिर्माणाची स्वप्नपूर्ती करण्याचा परमार्थ अशी सांगड घालून राष्ट्रवादीचे नेते दिलीपभाऊ कोल्हे यांनी बुधवारी शिवसेनेच्या शिंदेगटात गृहप्रवेश केला.**

दिलीप कोल्हे हे राष्ट्रवादीमधील वादग्रस्त नेते. त्यांच्या सौभाग्यवती माजी नगरसेविका. स्वत: कोल्हे यांनी उपमहापौर पदाच्या रूपातून पालिकेतील सत्तेची फळे चाखलेली. पराभव झाल्यानंतरही मागच्या दाराने पालिकेत प्रवेश करून राष्ट्रवादीमध्ये त्यांनी आपला धबधबा कायम ठेवला. पक्षात राहून पक्षसंघटनेबाबत परखड बोलणारे नेते म्हणून भाऊंची ओळख. त्यामुळे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांचे कधीच पटले नाही. थेट 'गॉडफादर' शरद पवार, अजित पवार यांच्याशी घरोबा असल्याने पक्षाचे स्थानिक पदाधिकारीसुध्दा त्यांना दबकून असत. राष्ट्रवादीने भरभरून दिले असतानाही कोल्हे यांनी मनगटावरचे घड्याळ का काढले? याचा शोध घेतला असता अनेक पैलू शिंदे गटाच्या प्रवेशामागे असल्याचे दिसून आले.







१) लक्ष्मी-विष्णू ही मिल कामगारांची शंभर वर्षांची चाळ आता जीर्ण झाल्यामुळे रहिवाशांचा जीव धोक्यात आला आहे. मिल बंद पडल्यामुळे त्यांच्या रोजीरोटीचा तसेच या घरकुलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दिलीप कोल्हे यांच्या सौभाग्यवती मंगला कोल्हे या नगरसेवक असताना त्यांनी सुभद्राबाई नागरी सहकारी गृहनिर्माण सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीच्या माध्यमातून या गोरगरीब कष्टकरी गिरणी कामगारांना हक्काचे घरकुल देण्याचा स्वप्न दाखवले.

२) स्वप्नपूर्तीसाठी गृहनिर्माण सोसायटीचा शुभारंभ राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि तत्कालीन पालकमंत्री पद्मसिंह पाटील यांच्या हस्ते केला. काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असतानाही आणि महाविकास आघाडीचे सरकार असतानाही हा प्रश्न सोडवण्यासाठी शरद पवार यांना साकडे घातले. मात्र पक्षातील नेतेमंडळींनी प्रत्येकवेळी कोलदांडा घातला.

३) ही जागा बी २ (म्हणजे कमर्शिअल झोन) आहे. या जागेवर गृहनिर्माण वसाहत उभी करायची असल्यास ही जागा बी १(रहिवासी झोन) करावी लागते. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव सादर केल्यावर राज्यशासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर त्या जागेवर घर साकारण्याचे स्वप्न पूर्ण होते. सत्ता असताना राष्ट्रवादीच्या नेतेमंडळींची मंत्रालयातील दालने आणि घराचे उंबरठे पालथे घातले. तरीही स्वप्नपूर्ती झाली नाही.

४) महाआघाडीचे सरकार असताना सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या माध्यमातून गृहनिर्माण साकारण्याचा प्रयत्न केला. मात्र वळसे-पाटील यांनी हा प्रस्ताव शहराध्यक्षांच्या माध्यमातून पक्षाकडे सादर करा, अशा सूचना केल्या. येथून वादाची पहिली ठिणगी पडली आणि कोल्हे यांनी पक्षातील अंतर्गत गटबाजीला चव्हाट्यावर आणण्यास सुरुवात केली.

५) राज्यातील महाआघाडीचे सरकार पडले. शिंदे-फडणवीस सरकार आले. शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यात रांगा लागल्या. कोल्हे यांच्याही अनेक वर्षापासून रखडलेला गृहनिर्माणचा प्रश्न सुटण्याच्या अशा पल्लवीत झाल्या. तसा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याने शिंदे गटाचा झेंडा त्यांनी हाती घेतला.

६) महाविकास आघाडीचे सरकार असताना पालिकेच्या निवडणुकीसाठी सातजणांची समिती गठीत करण्यात आली होती. त्यात कोल्हे यांचा समावेश होता. मात्र स्थानिक पदाधिकाऱ्यांनी समितीच्या सदस्यांमध्ये वाढ करत निर्णय प्रक्रियेपासून कोल्हे यांना डावलण्यास सुरुवात केल्याने त्यांची नाराजी वाढली अन् राष्ट्रवादी सोडण्याचा निर्णय घेतला.

## दुचाकीस ट्रॉलीची धडक; मामासोबत गावी जाण्यास निघालेल्या भाचीचा मृत्यू

सुराज्य/बार्शी

बार्शी येथील झाडबुके महाविद्यालयात शिकत असलेली मुलगी कॉलेज संपवून मामासोबत दुचाकीवरून गावी जात असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीची धडक बसल्याने कु.सानिका नारायण दिवटे (१७ रा.सिरसाव ता.परांडा) ही खाली पडल्याने तिच्या डोकिस जबर मार लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

ही घटना १५ रोजी दुपारी १२ च्या सुमारास बार्शी तालुक्यातील कंदलगाव रोडवरील करडे वस्ती नजीक असलेल्या नागोबा मंदिराजवळ होऊन याबाबत तालुका पोलिसात अकस्मात मयताची नोंद करण्यात आली. मयत मुलगी ही येथील झाडबुके महाविद्यालयात आर्टस् विभागात ११ वित्त शिकत होती या दिवशी कॉलेज संपवून सिरसाव गावी मामासोबत दुचाकीवर बसून परत जात होती. त्यावेळी अपघात स्थळाजवळ येताच पाठीमागून येणाऱ्या ट्रॅक्टर पुढे जात असताना तिच्या डोकिस ट्रॉलीची जबर धडक बसताच दुचाकीसह खाली पडताच तिच्या डोकिस जबर मार लागून गंभीर जखमी होऊन जागीच बेशुद्ध झाली होती . तर तिचा मामाही धडकेने कडेला असलेल्या शेतात पडला होता.



तातडीने तिला एका वाहनातून येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारास नेले होते पण त्यापूर्वीच ती मयत झाल्याचे तेथील वै द्यकीय अधिकाऱ्याने सांगितले.

ही अपघाताची घटना तालुका पोलिसांना समजल्याने त्यांनी दवाखान्यात जाऊन अकस्मात मयत नोंद केली. रात्री शवविच्छेदन होताच तिचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. तर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पहाणी करताना चालक वाहन सोडून पसार झाल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर ताब्यात घेतला आहे. पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत.

## दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून फार्मासिस्ट तरूणाने केली आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील बुधवार बाजार परिसरातील एका अपार्टमेंट मध्ये व्यवसायाने फार्मासिस्ट असलेल्या युवकाने दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली.जुनेद सलीम शेख (वय-२८ रा.बुधवार बाजार,सोलापूर) असे या युवकाचे नाव आहे.दि.१६ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली.

वर्षभरापूर्वीच एका डेंटिस्ट डॉक्टर तरुणीसोबत त्यांचा विवाह झाला होता.गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून जुनेद शेख डिप्रेशनमध्ये होते.याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.जुनेद शेख गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून मानसिक तणावात होते.एका कंपनीत फार्मासिस्ट म्हणून नोकरी करत होते. नोकरीवर असताना त्यांचे डेंटिस्ट डॉक्टर तरुणीसोबत विवाह झाला होता. त्यांची पत्नी सुद्धा मदर तेरेसा रुग्णालयात कामावर होत्या. काही कारणास्तव त्यांनी मल्टीनॅशनल कंपनीमधील नोकरी सोडून एका छोट्या कंपनीत नोकरी स्वीकारली होती.तसेच एका मेडिकल शॉपचे कामकाज देखील पाहत होते.बुधवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास त्यांनी बुधवार बाजार येथील राहत्या घरी अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. उडी मारल्या नंतर सरळ डोक्यावर खाली पडल्यामुळे गंभीर जखमा झाल्या होत्या. काही वेळानंतर कुटुंबीयांच्या लक्षात ही घटना आल्यानंतर त्यांनी आजूबाजूच्या नागरिकांच्या सहकार्यातून जवळच असलेल्या मार्कंडेय हॉस्पिटलमध्ये दाखल केले.परंतु उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली असून, घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार मस्के हे करीत आहे.



## एसटी कर्मचाऱ्यांना ३४ टक्के महागाई भत्ता

**मुंबई** : एसटी कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता ३४ टक्के झाला आहे. राज्य सरकारकडून याबाबतच अधिकृत पत्र महामंडळांना पाठवण्यात आले आहे. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. राज्य सरकारनं महागाई भत्ता ३४ टक्के केला आहे.

एसटी कर्मचा-यांचा प्रलंबित सहा टक्के महागाई भत्ता मिळावा म्हणून मान्यताप्राप्त महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेने मुख्यमंत्री शिंदेंची सलग तीन वेळा भेट घेतली होती.

## पीकअप पलटी होऊन तिघे ठार

**मोहोळ** : कोळेगाव (ता मोहोळ) पाटीजवळ कांदा घेवून निघालेला पीक अप जीप पलटी होवून झालेल्या अपघातात तीन जण ठार झाले आहेत.

कोरेगाव (ता कर्जत) येथून पीकअप जीप सोलापूर येथील मार्केट यार्ड येथे कांदा घेवून निघाला होता. तो मोहोळ सोलापूर दरम्यान मोहोळ पासून आठ कि मी अंतरावर असलेल्या कोळेगाव पाटीजवळ उताराला लागला असता त्याचा मागील टायर फुटल्याने तो पलटी झाला. या अपघात पिरमलसिंग धोंडीसिग परदेशी वय ५५ व दत्तात्रय भानूदास शेळके वय ५५ रा कोरेगाव ता कर्जत हे दोघे जण जागेवरच ठार झाले तर या पीक अप जिप चा चालक नितीन धुळाजी बदंगे हा गंभीर जखमी झाला होता त्यास तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परतु उपचारा दरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; दुधनीच्या आरोपीला सक्तमजुरी

**सोलापूर** : लग्नाचे आमिष दाखवून एका महाविद्यालयीन अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपावरून महादेव श्रीमंत कांबळे (वय २५ रा.दुधनी, ता.अक्कलकोट) यांस १० वर्षे सक्तमजुरी आणि ७ हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश व्ही.पी.आव्हाड यांनी आज रोजी ठोठावली.

गुन्ह्याची थोडक्यात पार्श्वभूमी अशी यातील आरोपीने २९ सप्टेंबर २०१८ रोजी यातील पिडितेस लग्नाचे आमिष दाखवून सोलापुरातील कॉलेज परिसरातून पळवून नेले होते. त्यानंतर अहमदनगर, दौंड आणि दुधनी या ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता.दरम्यान इकडे पिडिता वसतीगृहात हजर नसल्याचे वसतीगृहाच्या अधिक्षिका यांनी त्याबाबत पिडीतेच्या आईला फोन करून माहिती दिली होती. परंतु पिडिता आई वडिलांकडे गेली नसल्याचे समजले. यापूर्वीही आरोपीने पिडीतेला पळवून नेल्याची माहिती पिडीतेच्या आईने त्यांना दिली. त्यानंतर वसतीगृहाच्या अधिक्षीका यांनी जेलरोड पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणात महादेव कांबळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक निरीक्षक रोहित दिवसे यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.



या खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडिता, फिर्यादी आणि डॉक्टर यांची साक्ष महत्त्वाची ठरली. समोर आलेला साक्षीपुरावा व सरकारपक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस १० वर्षाची सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

दंडातील रकमेपैकी ५ हजार रुपये नुकसान भरपाई पिडीतेला देण्याचे आदेशात नमूद आहे. या खटल्यात सरकारच्या वतीने ॲड.एस.ए.डोके यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड.सतीश शेट्टी यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून हे.कॉ.मैंदर्गी व म.पो.कॉ. जहागीरदार यांनी मदत केली.

## जेवण वाढण्याच्या कारणावरून दोन गटात सत्तुरने मारहाण

**सोलापूर** : घराजवळ धार्मिक कार्यक्रमात जेवण वाढण्याच्या कारणावरून दोन गटात सुत्तुर, काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास होटगी (ता.दक्षिण) सोलापूर येथे घडली.सर्व जखमींना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

भीमा प्रल्हाद काळे (वय ३०) आणि त्याचा भाऊ नागनाथ काळे (वय ३२ रा. होटगी) अशी पहिल्या गटातील जखमींचे नावे आहेत. त्यांना शंकर काळे, अजय काळे आणि गोविंद काळे आणि या तिघांनी सत्तुर आणि दगडाने मारहाण केली. तर दुसऱ्या गटात गोविंद शंकर काळे (वय २६) आणि त्याचे वडील शंकर दौलत काळे (वय ५४) हे दोघे जखमी झाले. त्यांना भीमा प्रल्हाद काळे आणि अन्य दोघांनी सत्तुर आणि काठीने मारहाण केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




अहो घाबरु नका... कार्यक्रमाची पत्रिका आहे ही...

कल्याण
600-64-158

मेन बाजार
237-24-149

# अतिवृष्टीच्या नुकसानीचा शंभर कोटींचा प्रस्ताव शासनास सादर

## ▪ करमाळा, मंगळवेढा, सांगोला, माढा तालुक्यात ऑक्टोबरमध्ये झाली होती अतिवृष्टी

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात ऑगस्ट सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील २ लाख १७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. माढा आणि मंगळवेढा, सांगोला करमाळा तालुक्याला मोठा फटका बसला आहे. या गावातील नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. चार तालुक्यातील एकूण शंभर कोटींचा नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

यंदाच्या वर्षी परतीच्या पावसाने सोलापूर जिल्ह्याला झोडपून काढले. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले. पीक वाहून गेले. यामध्ये खरीपमधील मूग उडीद, सोयाबीन या पिकांबरोबरच द्राक्षे कांदा याला मोठा फटका बसला शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना चांगलाच फटका बसला आहे. सर्वाधिक फटका हा दक्षिण सोलापूर, बार्शी, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माढा, करमाळा, मंगळवेढा, सांगोला, माळशिरस या तालुक्यांना बसला आहे. अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यांना चारवेळा फटका बसला आहे. दोन लाख ३२ हजार २४३ शेतकऱ्यांच्या एक लाख ८२ हजार ५८३ हेक्टर शेती पिकांना फटका बसला होता. ऑक्टोबर मध्ये अतिवृष्टी झाली होती. ६५ मिलिमीटर पेक्षा आणि सरासरी पाऊस देखील झाला होता. या पावसामुळे कापणीला आलेली पिके वाय केली होती. या अतिवृष्टीचा फटका करमाळा, मंगळवेढा, सांगोला, माढा तालुक्यातील गावांना बसला होता. दिवाळी सुट्टीमुळे नुकसानीचे पंचनामे उशिरा चालू झाले आहे. सरासरी पावसाचे नुकसान वगळता ऑक्टोबर मध्ये चार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे कृषी विभागाकडून पूर्ण झाले आहे, सर्व अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदरच्या नुकसानीचा शंभर कोटींचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.



आतापर्यंत पहिल्या टप्यात ४२ कोटी मिळाले आहेत. दुसऱ्या टप्प्यातील १०७ कोटी मिळाले आहे. विशेष बाब ३६ कोटी देकिल प्राप्त झाले आहेत आता ऑक्टोबर महिन्यात चार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीचा १०० कोटीचा प्रस्ताव दाखल केला आहे.

माढा तालुक्यातील पाच गावे, करमाळा ८ गावे, सांगोला - २, मंगळवेढा ८ गावे, १९ गावातील ४४,४४७, शेतकऱ्यांचे ४६, २०४ क्षेत्र बाधित झाले आहे. यांचे पंचनामे पुर्ण होऊन मदतीचा प्रस्ताव दाखल केला आहे.

CMYK